बी.ए तृतीय वर्ष
अभ्यास पत्रिका नववी- मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतीहास प्रारंभ  ते १६00
विषय-वारकरी संप्रदायाचा आचारधर्म

डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे (मराठी विभाग)
कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार

# • वारकरी संप्रदाय-

- वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील मुख्य, महत्वाचा संप्रदाय आहे. संत ज्ञानेश्वर- संत नामदेव काळापासून वारकरी संप्रदायाचा स्पष्ट प्रभाव महाराष्ट्राच्या धार्मिक, अध्यात्मिक व इतर जीवनावर दिसून येतो.
  वारकरी म्हणजेच माळकरी. गळ्यामध्ये तुळशीची माळ घालणे व पंढरीची वारी करणे हे या संप्रदायाचे महत्वाचे लक्षण आहे.

# • वारकरी संप्रदायाचे नियम व आचार-

- वारकरी लोकांस माळकरी असेही म्हणतात . वारकरी या शब्दाचा अर्थ – वारी करणारा तर माळकरी या शब्दाचा अर्थ माळ घातलेला . तुळशीच्या लाकडांच्या मण्यांची माळ गळ्यात घालणे व पंढरीची वारी करणे हे वारकऱ्यांचे महत्वाचे लक्षण आहे . त्यामुळे वारकऱ्यांस माळकरी असेही म्हणतात .

# वारकरी बनण्याची प्रक्रिया –

- तुळशीची माळ गळ्यात घातली म्हणजे ती व्यक्ती माळकरी/वारकरी झाली असे म्हटले जाते . वारकरी संप्रदायाच्या नावातच वारी करणे अभिप्रेत असून माळ घातली कि वारी करणे हा नेमाचा एक भाग बनतो .ही माळ संप्रदायातील जेष्ठ व्यक्तीकडून घातली जाते. माळ गळ्यात घालताना 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल ... श्री ज्ञानदेव तुकाराम' असा जयघोष करतात. माळ गळ्यात घातल्यावर माळ घालणारी व्यक्ती संप्रदायाचे आचरणाचे नियम व वारी करण्याविषयी थोडक्यात सांगते. माळ घालणाऱ्या व्यक्तीस दक्षिणा वगैरे देण्याचा रिवाज नाही.
  क्वचित काहीजणांनी विठ्ठलाच्या पायावर अथवा संतांच्या समाधीवर माळ ठेवून स्वतःच माळ घातल्याचे संदर्भ सुध्दा मिळतात . काही वारकरी घराण्यामध्ये पाचवीच्या दिवशी (जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी करायच्या विधीच्या वेळेस ) माळ घातली जाते .

# माळकरी / वारकरी व्यक्तीवर पुढील बंधने घातली आहेत –

- नित्य ‘राम कृष्ण हरी’ – या मंत्राचा १०८ वेळा जप करावा .
- नित्य हरिपाठ म्हणावा . हरिपाठ म्हणजे वारकऱ्यांची संध्या आहे. हरिपाठ म्हणणे व हरिनाम या साधनावर एकविध निष्ठा ठेवणे हे वारकऱ्यांचे मुख्य लक्षण आहे.
- नित्य अथवा प्रसंगी भजन , कीर्तनादी कार्यक्रमात सहभागी व्हावे .
- एकादशीस दिवसभर उपवास करावा . द्वादशीस – म्हणजे दुसऱ्या दिवशी उपवास सोडावा .

- वर्षातून एकदा पंढरीची वारी व एकदा संत क्षेत्री वारी करावी . शक्य असल्यास आषाढी वारी पायी करावी .
- मांसाहार , मद्यपान वर्ज्य .
- सर्व व्यवहार सचोटीने करावा . ( जोडावे हे धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।। ) नीतीने जीवन जगणे हे वारकऱ्यांचे मुख्य लक्षण आहे. सर्व संतांनी याला अन्य बाह्य लक्षणापेक्षा अधिक महत्व दिले आहे.
- परपुरुष / परस्त्री विठ्ठल रुक्मिणी समान मानावे . जोडीदार हयात असताना दुसरा विवाह करू नये (एका पुरुषा दोन नारी । पाप वसे त्याचे द्वारी ।। )

धन्यवाद